# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## बुधवार, दि.२४ मे, २०२३ दुपारी १२:०० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५७ वी बैठक **बुधवार, दि.२४ मे, २०२३ रोजी दुपारी १२:०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस सदस्य हे उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | डॉ. राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ३) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. डॉ. गौतम सुबण्णा कांबळे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १७) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १८) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील, प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांनी दुरध्वनीद्वारे/पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ०१ | **प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या रिक्त असणाऱ्या प्र-कुलगुरु पदी नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३ पोटकलम (६) ऐवजी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दि.२४ नोव्हेंबर, २०२२ मध्ये अ.क्र. ७ अन्वये खालीलप्रमाणे सुधारणा केलेली आहे:<br>७. सार्वजनिक विद्यापीठ अधिनियमाच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (६) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल:-<br>"(६) प्र-कुलगुरु म्हणून एखाद्या व्यक्तीची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे हा, कुलगुरुचा विशेषाधिकार असेल. व्यवस्थापन परिषद, कुलगुरूच्या शिफारशीवरुन, विद्यापीठासाठी प्र-कुलगुरूची नियुक्ती करील."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या प्र-कुलगुरु यांची नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ. | कुलगुरु कार्यालय |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या रिक्त असणाऱ्या प्र-कुलगुरु पदी नियुक्ती करण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, दि.२४ नोव्हेंबर, २०२२ मधील अ.क्र.७ मध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३ पोटकलम ६ च्या सुधारणेन्वये मा. कुलगुरु यांना प्रदान केलेल्या विशेषाधिकार नुसार मा. प्रभारी कुलगुरु यांनी प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, संचालक, सामाजिकशास्त्रे संकुल यांची प्र-कुलगुरु पदाच्या नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| २(१) | विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या संदर्भातील दि.१५ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रानुसार कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: दि.१२/०१/२०१६ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.४८ नुसार विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या दि.१५ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रामधील Guidelines स्वीकृत केलेल्या आहेत. त्यास अनुसरुन शै. वर्ष २०१६-१७ पासून नमूद Guidelines ची अंमलबजावणी करण्याबाबतचा निर्णय विद्यापीठाने यापूर्वीच घेतला आहे.<br>त्यानुसार कोणतीही पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षा ही विहीत कालावधी मध्येच (अभ्यासक्रम पूर्ण करणेसाठी लागणारा कालावधी) (N+२) पूर्ण करावी लागेल, ही बाब सर्व संबंधीत विद्यार्थी व शिक्षक इत्यादींच्या निदर्शनास आणावी असे विद्यापीठ पत्र क्र.सोविसो/परीक्षा/२०१६-२०१७/९९१, दि.२६/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था यांना कळविण्यात आले आहे. परंतु काही सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, काही विद्यार्थी व पालक Backlog Subject अनुतीर्ण असल्याने व पदवी प्राप्त न झाल्याने मा.कुलगुरु यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून याबाबत चर्चा करण्यात आले.<br>त्याअनुषंगाने मा. कुलगुरुमहोदय यांनी सर्व संबंधीत घटकांचे एकत्रितरीत्या बैठक बोलवून याबाबत सर्वंकष चर्चा करुन व सद्य:स्थितीचा आढावा घेवून मा. सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याशी प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे चर्चा करुन दि.१५ ऑक्टोबर, २०१५ च्या नंतर याबाबत काही नवीन निर्णय झालेले आहेत का, तसेच याबाबत मार्गदर्शन घेतले असता उच्चस्तरीय संस्थेने घेतलेल्या निर्णयाची (Apex body) अंमलबजावणी करण्यात यावी असे सूचित करण्यात आले आहे. | अभ्यासमंडळे विभाग |

**ठराव:** विद्यापीठ अनुदान आयोग यांचे Guidelines on Determination of a Uniform span period within which a student may be allowed to qualify for a degree या संदर्भातील दि.१५ ऑक्टोबर, २०१५ च्या पत्रानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

१) याबाबत प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती अध्यक्ष / सदस्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. (डॉ.) गौतम कांबळे, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा,<br>प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा | सदस्य |
| ३. | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य |
| ४. | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ५. | डॉ. हनुमंत कृष्णा आवताडे | सदस्य |
| ६. | डॉ. दिपक चंद्रसेन ननवरे<br>विशेष कार्यासन अधिकारी | सदस्य |
| ७. | श्री. जावेद खैरदी, कायदा अधिकारी | सदस्य सचिव |

२) समितीची कार्यकक्षा ही Redegree & N+२ अशी असेल. मात्र दोन्हीचे स्वतंत्र अहवाल देणे आवश्यक आहे.

३) सदर समितीने कायदेशीर बाबींची पडताळणी करुन दोन्ही अहवाल स्वतंत्रपणे अधिष्ठाता मंडळापुढे सादर करावेत व अधिष्ठाता मंडळांच्या शिफारशीनंतर विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांच्या विचारार्थ सादर करण्यात यावे.

| विषय क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| २(२) | **दि. ३१ मे, २०२३ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था स्तरावर विविध उपक्रम राबवून सप्ताह साजरा करण्याची बाब विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तूत विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर असे नाव असल्याने तसेच त्यांचे कार्यकतृत्व विचारात घेवून त्यांच्या जयंतीचे औचित्त साधून विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था स्तरावर (विद्यापीठ / महाविद्यालयांच्या इमारतीस विद्युत रोषणाई, व्याख्याने, रांगोळी स्पर्धा, बौध्दीक स्पर्धा इ.) विविध उपक्रम साजरा करण्याची बाब विचारार्थ. | विद्यार्थी विकास विभाग |
| ठराव: | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर असे नाव असल्याने तसेच त्यांचे कार्यकतृत्व विचारात घेवून त्यांच्या जयंतीचे औचित्त साधून विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था स्तरावर इमारतीस विद्युत रोषणाई, व्याख्याने, रांगोळी स्पर्धा, बौध्दीक स्पर्धा इ. विविध उपक्रमांचे आयोजन करुन साजरा करण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| २ (३) | विद्यार्थ्यांच्या तक्रारी महाविद्यालय स्तरावर सोडवण्याचा प्रयत्न व्हावा, त्याठिकाणी तक्रारी नाही सुटल्यास विद्यापीठ स्तरावर Grievance Portal तयार करण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ |
| ठराव: | विद्यार्थ्यांच्या तक्रारी महाविद्यालय स्तरावर सोडवण्याचा प्रयत्न व्हावा, त्याठिकाणी तक्रारी नाही सुटल्यास विद्यापीठ स्तरावर Grievance Portal तयार करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| २ (४) | व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३ एप्रिल, २०२३ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे श्री. रविंद्र कोरे यांच्या समायोजनाबाबत मार्गदर्शनाचा प्रस्ताव पुनश्च: स्वतंत्रपणे शासनास पाठविण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | व्यवस्थापन परिषदेच्या दि.१३ एप्रिल, २०२३ रोजीच्या १५३ व्या बैठकीत श्री. रविंद्र कोरे यांच्याबाबत जो ठराव करण्यात आला होता त्या अनुषंगाने असे ठरले की, श्री. रविंद्र कोरे यांच्याबाबत शासनाकडून आलेल्या पत्रास अनुसरुन विद्यापीठाकडून त्याबाबत सविस्तर उत्तर पाठविणे. तसेच श्री. रविंद्र कोरे यांच्याबाबत व्यवस्थापन परिषदेत झालेल्या ठरावाचा निर्णय नमूद करुन समायोजनाबाबत मार्गदर्शनाचा प्रस्ताव स्वतंत्रपणे शासनास पाठवावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| २ (५) | वर्तमानपत्रात बातमी / जाहिरात प्रसिध्दीस देणेकरीता ब्लॉग तयार करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | वर्तमानपत्रात बातमी/जाहिरात प्रसिध्दीस देणेकरिता / येणेकरिता ब्लॉग तयार करण्याबाबत जनसंपर्क अधिकारी यांना सूचित करावे असे सर्वानुमते ठरले. | |

मा. प्रभारी कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद